उष्णतेच्या लाटेमुळे होणारे नूकसान /जिवित हानी कमीत कमी व्हावी यासाठी जनजागृती अभियान.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन प्रभाग)
शासन निर्णय क्र.:- आव्यप्र-२०१८/प्र.क्र.७८/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३ मे २०१८

प्रस्तावना :-

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ मधील तरतूदीनुसार आपत्ती व्यवस्थापनासाठी करावयाची खरेदी, घ्यावयाच्या सेवा तसेच क्षमताबांधणी, जनजागृती, प्रशिक्षण इत्यादी बाबत आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी आपत्ती व्यवस्थापन प्रभागावर आहे. त्यासाठी दिनांक २०.०४.२०१८ रोजी झालेल्या राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी करावयाच्या खर्चाचे अधिकार आपत्ती व्यवस्थापन प्रभागास दिलेले आहेत. त्यानुषंगाने विभागांतर्गत करावयाची खरेदी घ्यावयाच्या सेवा यासाठी विभागांतर्गत निविदा समिती / खरेदी समितीची स्थापना महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल२०१८ अन्वये करण्यात आली आहे.

भारतीय हवामान खात्याने यावर्षी देशाच्या विविध भागात उष्णतेची लाट येवून सदर लाट दिर्घकाळ राहण्याचा अंदाज वर्तविला आहे. देशातील संभाव्य तीव्र उष्णतेच्या लाटेचा अंदाज विचारात घेऊन राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्णतेच्या लाटेसंदर्भात फेब्रुवारी २०१८ मध्ये राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. संभाव्य उष्णतेच्या लाटेमुळे होणारे नूकसान / जिवित हानी कमीत कमी व्हावी यासाठी सर्व राज्यांनी प्रयत्न करावे असे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने या कार्यशाळेत स्पष्ट केले. अमेरिकेतील नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलच्या प्रतिनिधींनी या कार्यशाळेत भारतीय हवामान खात्याचा उष्णतेच्या लाटेबाबतचा अंदाज गांभिर्याने घेऊन प्रभावित होणाऱ्या सर्व राज्यांनी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सूचित केले आहे.

चालू वर्षी राज्याच्या सर्व भागात तापमानात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे राज्याच्या ग्रामीण भागात शेतावर किंवा शासनाच्या विविध योजनांवर उन्हामध्ये काम करणारे शेतकरी, शेतमजूर आणि अन्य कार्यरत व्यक्ती पुरेशा सुरक्षेविना किंवा आवश्यक साहित्य उदा. पाणी, कांदा इत्यादी सोबत न घेता गेल्यास तीव्र उन्हाच्या तडाख्यामुळे अशा व्यक्तींना भयंकर परिणामांना सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्माघतापासून राज्यातील जनतेने स्वसंरक्षार्थ काय करावे याबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडाळाच्या बसस्थानकांवर ऑडियो जिंगल प्रसारीत करण्यासाठी एकाधिकार असलेल्या व्रित्ती सोल्यूशन लि. पुणे यांनी या विभागाच्या निविदा समितीपुढे केलेल्या सादरीकरणांनतर बसस्थानकांवर ऑडियो जिंगल्सच्या माध्यमातून जनजागृती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

भारतीय हवामान खात्याने सन २०१८ च्या उन्हाळ्यात देशाच्या विविध भागांमध्ये उष्णतेची लाट लवकर येवून दिर्घकाळ राहण्याचा अंदाज वर्तविला असल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सोबतच्या निवडक ८० बसस्थानकांवर सकाळी ८.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत (१० तास) दिनांक ४ मे २०१८ ते दिनांक ३१ मे २०१८ (एकूण २८ दिवस) या कालावधीत उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी काय करावे व काय करु नये याबाबतची माहितीपर आणि जनजागृती विषयक संदेश प्रसारणाचे काम व्रित्ती सोल्यूशन लि. पुणे यांना देण्यास आणि त्यासाठी होणाऱ्या रु. ९८,३२,७०४/- (रुपये अठ्ठ्यान्नव लाख बत्तीस हजार सातशे चार फक्त) एवढ्या खर्चास खालील अटींवर शासन मान्यता देण्यात येत आहे.

- ८० बसस्थानकांवर सकाळी ८.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत (१० तास) दिनांक ४ मे २०१८ ते दिनांक ३१ मे २०१८ (एकूण २८ दिवस) या कालावधीत संगणकीय उद्दघोषणा यंत्रणा चालवल्याचे आणि आपत्ती विषयक जनजागृती करण्यात आलेल्या प्रसारणासंदर्भातील संबंधित प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रमाणपत्र सादर करणे व्रित्ती सोल्यूशन लि. पुणे यांच्यावर बंधनकारक राहील.
- नेमून दिलेले काम पुर्ण केल्यांनतर कंपनीस देयक अदा करण्यात येईल.
- वरीलप्रमाणे प्रसारण प्रसारीत न झाल्यास उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक १.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- वरील प्रसारणासाठी व्रित्ती सोल्यूशन लि. पुणे यांना प्रत्यक्ष देयकाच्या आधारे एकूण प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत प्रदान करण्यात येईल.
- काही अपरिहार्य कारणास्तव देयक अदा न झाल्यास / अदा करण्यास विलंब झाल्यास व्रित्ती सोल्यूशन लि. पुणे कोणतीही हरकत घेणार नाही, कोणतीही कायदेशीर कारवाई करणार नाही तसेच, विलंब कालावधीवर कोणत्याही व्याजाची मागणी करणार नाही

सदर आदेश वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८ आणि वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२ दिनांक १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग- पहिला, उपविभाग-तीन अनु.४, परिच्छेद क्रमांक २७ (२) अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

याकामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८०- सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (०१) (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधनसामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५ १७६१) ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून त्याचा सांकेतांक २०१८०५०४१५४५५१६५१९ असा आहे. सदरचे आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.05.04 15:49:30 +05'30'

(श्रीरंग घोलप)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखाकार (महाराष्ट्र -१), मुंबई.
३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४. वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
५. महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई सेन्ट्रल, मुंबई.
६. लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
७. व्रित्ती सोल्यूशन लि. पुणे.
८. निवड नस्ती.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.:- आव्यप्र-२०१८/प्र.क्र.७८/आव्यप्र-१ दि. ३ मे २०१८ चे सहपत्र

जिल्हा क्रं.	जिल्ह्याचे नाव	क्रं.	स्थानकाचे नाव
१	**मुंबई (एकूण = ६)**	१	मुंबई सेन्ट्रल
		२	परेळ
		३	कुर्ला नेहरू नगर
		४	बोरीवली नान्सी
		५	खोपोली
		६	पनवेल
२	**ठाणे (एकूण = ५)**	७	ठाणे वंदना
		८	ठाणे खोपट नवीन
		९	भिवंडी
		१०	नवघर वसई
		११	कल्याण
३	**रायगड (एकूण = २)**	१२	अलिबाग
		१३	रामवाडी (पेण नवीन)
४	**रत्नागिरी (एकूण = १)**	१४	रत्नागिरी सीबीएस
५	**सिंधुदुर्ग (एकूण =१)**	१५	सावंतवाडी
६	**कोल्हापूर (एकूण = ४)**	१६	कोल्हापूर सीबीएस
		१७	इचलकरंजी
		१८	कोल्हापूर रेल्वे स्टेशन
		१९	रंकाळा
७	**सांगली (एकूण = ३)**	२०	सांगली सीबीएस
		२१	मिरज नवीन सीबीएस
		२२	मिरज जुने
८	**सोलापूर (एकूण = २)**	२३	सोलापूर § सीबीएस
		२४	पंढरपूर
९	**सातारा (एकूण = ५)**	२५	सातारा सीबीएस
		२६	कराड
		२७	महाबळेश्वर
		२८	पाचगणी
		२९	राजवाडा
१०	**पुणे (एकूण = ७)**	३०	पुणे § शिवाजीनगर
		३१	पुणे § स्वारगेट
		३२	पुणे रेल्वे स्टेशन
		३३	पिंपरी चिंचवड
		३४	लोणावळा
		३५	शिरूर
		३६	बारामती

११	**अहमदनगर (एकूण = ६)**	३७	अहमदनगर ओल्ड सीबीएस
		३८	अ.नगर स्टेशन नं ३
		३९	अहमदनगर - तारकपूर
		४०	शिर्डी
		४१	श्रीरामपूर
		४२	संगमनेर
१२	**नाशिक (एकूण = ५)**	४३	नाशिक नवीन सीबीएस
		४४	नाशिक महामार्ग
		४५	नाशिक रोड
		४६	मालेगाव नवीन सीबीएस
		४७	मनमाड
१३	**ज़ळगाव (एकूण = ५)**	४८	जळगाव § सीबीएस
		४९	चाळीसगाव
		५०	भुसावळ
		५१	जळगाव शहर
		५२	अमळनेर
१४	**नंदुरबार (एकूण = १)**	५३	नंदुरबार सीबीएस
१५	**धुळे (एकूण = १)**	५४	धुळे सीबीएस
१६	**उस्मानाबाद (एकूण = २)**	५५	उस्मानाबाद सीबीएस
		५६	तुळजापूर सीबीएस
१७	**बीड (एकूण = १)**	५७	बीड सीबीएस
१८	**औरंगाबाद (एकूण = २)**	५८	औरंगाबाद § सीबीएस
		५९	औरंगाबाद § सिडको
१९	**जालना (एकूण = १)**	६०	जालना सीबीएस
२०	**लातूर (एकूण = १)**	६१	लातूर सीबीएस
२१	**परभणी (एकूण = १)**	६२	परभणी सीबीएस
२२	**नांदेड (एकूण = १)**	६३	नांदेड सीबीएस
२३	**हिंगोली (एकूण = १)**	६४	हिंगोली
२४	**यवतमाळ (एकूण =१)**	६५	यवतमाळ सीबीएस
	बुलढाणा (एकूण = ३)	६६	बुलढाणा सीबीएस
२५		६७	मेहकर
		६८	मलकापूर
	अकोला (एकूण = २)	६९	अकोला नवीन सीबीएस
२६		७०	अकोला जुने
२७	**वाशीम (एकूण =१)**	७१	वाशीम
२८	**अमरावती (एकूण =२)**	७२	अमरावती सीबीएस
		७३	बडनेरा
२९	**चंद्रपूर (एकूण = १)**	७४	चंद्रपूर सीबीएस
३०	**भंडारा (एकूण = १)**	७५	भंडारा सीबीएस
३१	**गोंदिया (एकूण = १)**	७६	गोंदिया

३२	**गडचिरोली (एकूण = १)**	७७	गडचिरोली सीबीएस
३३	**वर्धा (एकूण = १)**	७८	वर्धा सीबीएस
३४	**नागपूर (एकूण = २)**	७९	नागपूर - पेठ
		८०	नागपूर मोरभवन

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.05.04 15:49:50 +05'30'

(श्रीरंग घोलप)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन